

**Pratik S. Mehkarkar**
Final Year I.T.
Application Developer




*The Group of College Friends has taken the initiative to do some social work for society and established the "Sath BahuddeshiyaSanstha" on 2nd Feb 2016. Furthermore the thousands of people in Maharashtra has joined through the Sath's Whatsapp groups and fulfilled 500+ blood requirements in Maharashtra. One more step towards success has taken and successfully launched Sath android application on Google Play Store on 11th Oct 2016. More than 500 peoples in Maharashtra has installed the app and taken the resolution to donate the blood by registering as a donor.*

*The main aspect to develop Sath application is that, the needy person can contact to Sath team for help. The Sath Helpline feature provides the tap to call functionality, so that user can make direct call to Sath Team Members in particular cities. One important feature provided in this application is emergency 24/7 contact directory with tap to call functionality. Firebase Cloud push notification & Google Admob service has also integrated in this application.*

## Application Contributers:

1. Shubham S. Shinde (Final Year IT)
2. Gopal D. Tayde (Final Year IT)
3. Akshay A. Gulhane (Final Year IT)
4. Ketan V. Chavhan (Final Year IT)

Google Play Application Link
https://play.google.com/store/apps/details?id=com.sath.vasu.sath

Google Play Developer Link
https://play.google.com/store/apps/dev?id=8345885293340683167

# साथ आता गूगल प्ले स्टोरवर




## ॲपद्वारे मिळणार रक्तासह आपत्कालीन माहिती

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. २० : सोशल मीडियाचा प्रभावी उपयोग करीत शहरातील काही तरुणांनी रक्ताची नितांत गरज असलेल्यांसाठी व्हॉट्सॲपवर साथ- ब्लड हेल्पिंग कम्युनिटी नावाने एक ग्रुप सुरू केले. या एका छोट्याशा ग्रुपने सुरवात झालेल्या या उपक्रमाचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले. साथ बहुउद्देशीय संस्थेने एक वर्षापूर्वी या उपक्रमाला सुरवात करून तरुण पिढीपुढे आदर्श निर्माण केला. प्रारंभी केवळ व्हाट्सॲपवर असलेल्या या ग्रुपने सोशल मीडियाचा पुरेपूर वापर करीत साथ नावाचे एक ॲपच तयार केले. आता या ॲपच्या माध्यमातून गरजूंना पुरेपूर माहिती मिळू शकणार आहे. गुगल प्ले-स्टोरवर या तरुणाईने साथ नावाने हे ॲप सुरू केले. आकाश राठोड, निखिल जामटकर, शुभम सोनारे, प्रफुल्ल येंगरे, प्रथमेश अवाळकर, कौस्तुभ काटोंके, शुभम घावले, विपुल माने, प्रणव जोशी, अंकित वारकरी, राजेश भाकरे, गणवीनाथ वापाळ, कार्तिक कदम, नवल केदार, प्रफुल्ल रोंघे, विठ्ठल




साळुंखे, पंकज घोडके, शुभम सोनारे, प्रतीक मेहरकर यांसह इतर सदस्य सातत्याने हा मोहीम चालवीत आहेत.

### गूगल प्ले स्टोरवरून करता येईल डाउनलोड

एखाद्याला हे ॲप हवे असल्यास गूगल प्ले स्टोरवर साथ नाव टाकून सेटपूर्णला ते डाउनलोड करता येईल. ॲप डाउनलोड केल्यानंतर होमपेज खुले होईल. त्यावर सहा विविध ऑप्शनमध्ये माहिती देण्यात आली. साथ बहुद्देशीय संस्थेची माहिती, साथचे हेल्पलाइन नंबर्स, डोनर रजिस्ट्रेशन फॉर्म, साथ एक्झ्युक्युटिव्ह लॉगिन आणि साथबद्दल संपूर्ण माहिती यात देण्यात आलेली आहे.

### २४ बाय ७ इमर्जन्सी नंबर

या ॲपमध्ये २४*७ इमर्जन्सी अशा नावाचे एक ऑप्शन आहे. यात रुग्णालय, अग्निशमन, ब्लडबँक, पोलिस ठाणे, रेल्वे व बसस्थानकाचा संपर्क क्रमांक देण्यात आला. बडनेरा अभियांत्रिकीच्या प्रतीक मेहरकर याने हे ॲप तयार केलेले असून; यामध्ये नावीन्य आणि अधिक माहिती अपलोड केली जाणार असल्याचे साथचे आकाश राठोड यांनी सांगितले.